# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ३३
# सभा क्र.४४, दिनांक ०१/११/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा (शुक्रवार, दि. २८/१०/२०२२ रोजीची) मंगळवार, दि. ०१/११/२०२२ रोजी, दुपारी ४.०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिकाभवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**<u>वृत्तांत कायम करणे</u>**

मा. स्थायी समिती सभा क्र. ४०, दि. १४/१०/२०२२, सभा क्र. ४१, दि. १९/१०/२०२२, सभा क्र. ४२, दि. २१/१०/२०२२ व सभा क्र. ४३, दि. २८/१०/२०२२ असे एकूण ०४ वृत्तांत कायम करण्यात आले.

**<u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>**

**<u>सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स</u>**

**विषय क्र.९९०**

पुणे मनपाच्या शिक्षण विभाग ( प्राथमिक ) कडील विद्यानिकेतन व इंग्रजी माध्यम शाळांसाठी दर्जेदार कंपास पेटी व रायटिंग पॅड, कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील नागरी सुविधा केंद्र व मुख्य लेखा व वित्त विभागाकडील प्रा.फंड व कोष कार्यालयाकडील कामकाजासाठी प्रीपिंटेड स्क्रोल स्टेशनरी साहित्य खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे L1 ठेकेदार मे. कल्पक एंटरप्रायझेस, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (पुगप पेक्षा ०.६२०३% कमी) असल्याने त्यांचेकडून मा.अति.महा. आयुक्त (ई) यांचे विषयपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे र.रु.४४,०४,०००/– (सर्व करांसह) पर्यंत काम करून घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा, तसेच त्यापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ई) यांचे जा.क्र. मआ/भांडार/७९२,दि. २१/१०/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.९९१**

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. ४ ते५ मध्ये असलेल्या एल.पी.जी. गॅस शव दाहिन्यांमध्ये एल.पी.जी. गॅसचा पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदारमे. मोरेश्वर एच.पी.गॅस एजन्सी यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.२८,९०,५५६=२१ पेक्षा ३.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २८,९०,५५६=२१ + ० %GST= २८,९०,५५६=२१ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनां (१४/०९/२०२२) पासून सुरू करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ईस्टेट) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/७९३,दि. २५/१०/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.९९२**

पुणे महानगरपालिकेकडील १ ते २० मंडईमधील व मंडईहद्दीतील दैनंदिन साफसफाई कामाकरिता अकुशल कामगारांची ठेकेदारामार्फत सेवा घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार शारदा सर्व्हिसेस व मे. निलेश दिलीप काळे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.१,६९,९६,१३७/– पेक्षा ०.०९% जास्त )असल्याने त्यांचेकडूनर.रु. १,७०,११,४३४/– या प्राप्त झालेल्या रकमेपैकी प्रत्येकी र.रू. ८५,०५,७१७/– या प्रमाणे र.रू.१,७०,११,४३४/– या रकमेपर्यंत दोन्ही ठेकेदारांकडून विभागून काम करून घेण्यासाठी अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस तसेच सदर काम अत्यावश्यक असल्याने प्राईस बीडच्या दिनांकापासून काम करून घेण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/७९४,दि. २५/१०/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>मागील सभेचे विषय</u>**

**विषय क्र.९९३**

पुणे महानगरपालिकेचे विविध जलकेंद्रासाठी द्रवरूप तुरटी ग्रेड V (IS 299:2012 नुसार )पुरविणे ( मेक मे.विक्रम केमिकल्स, मे. सार्क केमिकल्स, मे. जे.के. इंडस्ट्रीज, उस्मानाबाद, मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स, मुंबई ) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदारमे. स्वानंद ट्रेडर्स प्रा.लि. व मे. जे.के.इंडस्ट्रीज, उस्मानाबादयांचेकडून खरेदी करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/७६५, दि. १७/१०/२०२२ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेचे विविध जलकेंद्रासाठी द्रवरूप तुरटी ग्रेडV (IS 299:2012 नुसार )पुरविणे ( मेक मे.विक्रम केमिकल्स, मे. सार्क केमिकल्स, मे. जे.के. इंडस्ट्रीज, उस्मानाबाद, मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स, मुंबई) या कामी मे. स्वानंद

ट्रेडर्स प्रा.लि. व मे.जे.के. इंडस्ट्रीज उस्मानाबाद यांनी कामाचे पूर्वगणनपत्रक रक्कम रूपये ५,९४,६३,४८५=३५ साठी (०.१६% कमी दराने ) रक्कम रूपये १०,१३५=६० (GST वगळून) प्रतिमे. टन प्रमाणे र.रू. ५,९३,६४,२०९=२० दर दिलेला असून या अनुषंगे एकूण ५८५७ मे. टन पैकी अनुक्रमे ( ७०% ) ४०९९.९ मे. टन, (मे. स्वानंद ट्रेडर्स प्रा.लि.) व (३०%)१७५७=१ मे.टन, (मे. जे.के. इंडस्ट्रीज) या प्रमाणे एकूण ५८५७ मे. टन एकूण र.रू. ५,९३,६४,२०९.२+१८%GST र.रू.१,०६,८५,५५७=६५ र.रू. ७,००,४९,७६६.८५/– पर्यंत दि. १५/०९/२०२२ पासून खरेदी करणेस.

२) सदर खरेदीसाठी मे. स्वानंद ट्रेडर्स प्रा.लि. व जे.के.इंडस्ट्रीज यांचेशी करारनामा करणेस व अनामत रक्कम भरून घेणेस.

३) सदर केमिकलचे पुरवठ्यापोटी पुरवठादारांस बिल आदा करणेस.

४) XE12A105, XE12P104 या बजेट हेडवर खर्ची टाकणेस.

( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.९९४**

पुणे मनपाच्या विविध जलकेंद्रासाठी स्टेबल ब्लिचिंग पावडर ग्रेड १ IS १०६५ (Part-२): २०१९ ( मेक – ग्रासिम/डी.सी.एम श्रीराम/ जी.ए.सी.एल. ) पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार मे. एस.व्ही.एस. केमिकल एल.एल.पी व मे . गिरीराज ट्रेडिंग कंपनी यांचेकडून खरेदी करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/७६९, दि. १७/१०/२०२२ चे पत्र.

१)पुणे मनपाच्या विविध जलकेंद्रासाठी स्टेबल ब्लिचिंग पावडर ग्रेड १ IS १०६५ (Part-२): २०१९ ( मेक – ग्रासिम/डी.सी.एम श्रीराम/ जी.ए.सी.एल. ) पुरविणे या कामाचे पूर्वगणनपत्रक रक्कम रूपये – ४४,००,०००/– साठी पूर्वगणनपत्रकाच्या १% कमी याप्रमाणे र.रू. २१,७८०/– (GST वगळून) प्रति मे. टन प्रमाणे र.रू. ४३,५६,०००/– या अनुषंगे एकूण २०० मे. टन पैकी अनुक्रमे मे. एस.व्ही.एस. केमिकल एल.एल.पी (५०%) व मे . गिरीराज ट्रेडिंग कंपनी (५०%) या प्रमाणे एकूण र.रू. ४३,५६,०००+ १८ % GSTर.रू. ७,८४,०८०/–र.रू. ५१,४०,०८०/– पर्यंत दि. १/१०/२०२२ पासून खरेदी करणेस.

२) सदर खरेदीसाठी मे . गिरीराज ट्रेडिंग कंपनी व मे. एस.व्ही.एस. केमिकल एल.एल.पी यांचेशी करारनामा करणेस व अनामत रक्कम भरून घेणेस,

३) सदर केमिकलचे पुरवठ्यापोटी पुरवठादारांस बिल आदा करणेस.

४) XE12S154 या बजेट हेडवर खर्ची टाकणेस.

( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.९९५**

बिबवेवाडी कार्यालय अंतर्गत सर्व प्रभागातील पडीक हद्दीतील स्वच्छतेसाठी बिट्सनुसार झाडण काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे./श्री. सुमित फॅसिलिटीज लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ४,९९,८८,६४०/– पेक्षा ४.३५ % जास्त ) असल्याने त्यांचेकडूनर.रु. ५,५२,९२,५४३=९०४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ अदा करणेस/कपात करणेस, सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने व आऊटसोर्सिंग कचरा वेचक कंत्राटी कामगारांचे वेतन अदा करणेस व देयक देणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/७३०, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.९९६**

कसबा–विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये झाडण कामाकरिता मजूर पुरविणे व त्यांच्याकडून काम करून घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आदित्य सप्लायर्स यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. १,४५,७१,५८५=६०० पेक्षा अॅटपार दराने ) असल्याने त्यांचेकडूनर.रु. १,४५,७१,५८५=६०० या टेंडर निविदा रकमेपैकी माहे सप्टेंबर २०२२ नंतर होणाऱ्या कामाच्या उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांच्याशी करारनामा करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/७३१,दि. १२/१०/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.९९७**

कोथरूड – बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पडिक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊट सोर्सिंग पद्धतीने करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस अॅण्ड सिस्टीम प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ६,८०,८९,०४५=४४० पेक्षा अॅटपार दराने ) असल्याने त्यांचेकडूनर.रु. ६,८०,८९,०४५=४४० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ अदा करणेस सदर काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने या कामाचा कालावधी माहे दि.२४ एप्रिल २०२२ पासून गृहीत धरणेस व त्यानुसार काम करून घेणेस व त्यांच्याशी

करारनामा करणेस व बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/७३२, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.९९८**

शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पडीक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊट सोर्सिंग पद्धतीने करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र. रु. ३,३१,१७,२४०/–पेक्षा ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडून र. रु. ३,३१,१७,२४०/– पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ अदा करणेस तसेच निविदा उघडल्याचे दिनांकापासून काम करून घेणेस वत्यादिवसापासून बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/७३३, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.९९९**

औंध–बाणेर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत आऊट सोर्सिंग पद्धतीने हद्दीतील झाडणकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. प्रियांक एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. १०,५९,७५,१६८/– पेक्षा ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडूनर.रु. १०,५९,७५,१६८/– पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस, सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने आऊट सोर्सिंग कचरा वेचक कंत्राटी कामगारांचे दिनांक १६/५/२०२२ पासून वेतन अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस व देयक अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/७३४, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१०००**

ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत आरोग्य विभागामार्फत प्रभागातील सार्वजनिक स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडणकाम/साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सुमित फॅसिलीटी प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ५,०३,३३,२०४=८० पेक्षा ॲटपार (०.००%) दराने) असल्याने त्यांचेकडूनर.रु. ५,०३,३३,२०४=८० ॲटपार रकमेपर्यंत दि. ०१/०८/२०२२ पासून काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/७३५, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१००१**

महापालिका सहाय्यक आयुक्त धनकवडी सहकारनगर कार्यालया अंतर्गत झाडण कामाकरिता मजुर पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे./ श्री. Priyank Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु. ९,४३,१७,८९९=५२ पेक्षा (०.००% ॲटपार) दराने ) असल्याने त्यांचेकडूनर.रु. ९,४३,१७,८९९=५२ नुसार उपलब्ध तरतुदी पर्यंत काम करून घेणेस तसेच मे. शासनाकडून किमान वेतन दरातील विशेष भत्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार फरक अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/७३६, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१००२**

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय वारजे कर्वेनगर अंतर्गत आऊट सोर्सिंगने कचरा संदर्भात कामे करून घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. प्रियांक एंटरप्रायझेस यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे( टेंडर र.रु. ९,३०,२१,२३२=२०पेक्षा ०.००% ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडूनर.रु. ९,३०,२१,२३२=२० पर्यंतकाम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/७४०, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१००३**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल विकसित करणे या प्रकल्पाअंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिट नोट निर्माण करणे या करिता सॉफ्टवेअर बनविणे व डेव्हलपमेंट क्रेडिट नोटची छपाई तसेच अनुषंगिक प्रिंटर खरेदी करणे (बी–२ पद्धतीची) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. न्याती टेक्नोलॉजीस प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडूनर.रु. ८२,८४,७५४/– अधिक जी.एस.टी. पर्यंत अदा करणेस / करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र. मआ/पथ/६४३,दि. २३/९/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१००४**

लक्ष्मी रस्ता दुभाजक दुरूस्ती व पेंटिंग, पेडेस्ट्रीयन क्रॉसिंग, थर्मोप्लास्टिक पेंट, साईन बोर्ड, कर्ब स्टोन दुरूस्ती व पेंटिंग तसेच रस्ते देखभाल दुरूस्ती विषयक व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. साईलिला कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ३५,२४,०८१/– पेक्षा १.०० % कमी ) असल्याने त्यांचेकडूनर.रु. ३४,८८,८४०=१९ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र. रू. ६,२७,९९१=२३ पर्यंत अधिक लेबर सेस र.रू. ३५,२४१/– पर्यंत अधिक वर्कर इन्शुरन्स र.रू. १७,६२०/–(असे एकूण र.रू. ४१,६९,६९२=४२ ) पर्यंत काम करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/५८३,दि. २०/९/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१००५**

पुणे मनपाच्या पौड व घोले रोड कचरा हस्तांतरण केंद्रावरून पुणे मनपाच्या कोणत्याही कचरा प्रक्रिया प्रकल्पांपर्यंत घनकचऱ्याची सेकंडरी वाहतूक भाडेतत्वावरील ३१ मे. टन जीव्हीडब्ल्यू, २८ क्यु.मी. क्षमतेच्या बी.आर.सी. वाहनाच्या साहाय्याने करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ४,५९,४४,०१०/– पेक्षा ५ % जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४,८२,४१,२१०=५० पर्यंत करणे कामी मान्यता मिळणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा. क्र मआ/मोवावि/३००,दि. १५/७/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १००६**

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील वाहनतळांचे बाबतीत कोवीड–१९ या साथरोगाचे कालावधीतील वार्षिक मक्ता रकमेमध्ये काही प्रमाणात सवलत मान्य करणेबाबत मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. १२/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/प्रकल्प/८०७ दि.३/११/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १००७**

पुणे शहराच्या हद्दीमधील रस्त्यांवर विविध सेवा वाहिन्या टाकणेसाठी शासकीयसंस्थांना देण्यात येणारी सवलत रद्द करणेयाकरिता खालील बाबींस मा. स्थायी समिति मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/७११, दि.११/१०/२०२१ चे पत्र.
१. मा. मुख्य सभेने ठ.क्र. ७० दि. २२/६/२०१५अन्वये पारित केलेला ठराव निरस्तकरणेस.
२. मे.एम.एन.जी.एल., महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळ व इतर सर्व शासकीय संस्थाना रस्तापुर्नस्थापना दरामध्ये देण्यात येणारी सवलत रद्द करुनपुणे महानगरपालिकेमार्फतदरवर्षीच्या दरपत्रकानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे दर आकारणेस.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १००८**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन /७१ दि. २०/५/२०२० चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते.)
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १००९**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १०१०**

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सद्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरात वाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१००७ दि.२२/३/२०२१ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १०११**

भूमीगत केबलसाठी आकारणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/४२२ दि.१०/८/२०२१ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १०१२**

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/खाजगी/सरकारी/निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (र.रु.) | प्रस्तावित दर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व<br>अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १०१३**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेशशुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १०१४**

१५ व्या वित्तीय आयोग अंतर्गत पुणे महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या निधीमधून पुणे शहरातील घनकचरा व्यवस्थापन करणे करिता टिपर खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एक्सेल व्हेईकल्स अ युनिट ऑफ माय कार पुणे प्रा.लि, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( पु.ग.प. र. रु. ५,८७,८२,३७५/– पेक्षा २५.६० % जास्त व पूर्वगणनपत्रक (ज्यामध्ये जीएसटी चा समावेश आहे) रक्कमेपक्षा (+) १६.१७ % जास्त ) असल्याने १ नग करिता रक्कम रू. १९,२९,०३७=४१ (जीएसटी अतिरिक्त १८ %) नुसार रक्कम रू. २२,७६,२६४=१४ त्यांचेकडून जीएसटी, वाहतूक, आरटीओ, रजिस्ट्रेशन या सर्व खर्चासह याप्रमाणे ३० नग ९ क्यू. मी. क्षमतेचे टिपर करिता र.रू. ५,७८,७१,१२२=२८ (जीएसटी अतिरिक्त १८ %) नुसार र.रु. ६,८२,८७,९२४=२९ जीएसटी, वाहतूक, आरटीओ, रजिस्ट्रेशन या सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/६८४,दि. २९/९/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १०१५**

स्वारगेट पाणीपुरवठा क्रमांक १ अंतर्गत येणाऱ्या विविध भागात टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. राजा कंस्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे ( टेंडर र. रु.३९,९९,१८७/– पेक्षा ०.०० % ॲटपार )

असल्याने त्यांचेकडून र. रु. ३९,९९,१८७/– ची निविदा मान्य करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/६८९, दि. २९/९/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय – फेर विषयपत्र सादर करण्यात यावे.**

**विषय क्र.१०१६**

स्वारगेट पाणीपुरवठा क्रमांक १ अंतर्गत येणाऱ्या कात्रज, गुजरवाडी व इतर विविध भागात टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. गुजर वॉटर सर्व्हिस, कात्रज, पुणे यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.३९,९९,६५१/– पेक्षा ०.१० % कमी ) असल्याने त्यांचेकडूनर.रु. ३९,९५,८५१=३५ ची निविदा मान्य करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/६९०,दि. २९/९/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १९/१०/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय – फेर विषयपत्र सादर करण्यात यावे.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र.१०१७**

येरवडा येथे तारकेश्वर पुलाचे रूंदीकरण व टी– जंक्शन विकसित करणेसाठी र.रू. ३ कोटी २८ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/ ७९५, दि. २५/१०/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,मुख्य अभियंता (प्रकल्प) ,पुणे महानगरपालिका, सन २०२२–२३ च्या अंदाजपत्रकातील तरतूद भूसंपादन, संरक्षण खाते/ अन्य खात्याच्या परवानगी अथवा अन्य स्वरूपाच्या तांत्रिक अड्चणी/ प्रश्न मार्गी लागल्यानंतर बंद असलेले / रखडलेले प्रकल्प सुरू करणेसाठी करावयाची तरतूद र.रू. २५००.०० लक्ष<br>बजेट कोड नं. (FE61A118/B-113) | र.रू. ३ कोटी २८ लक्ष | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>येरवडा येथे तारकेश्वर पुलाचे रूंदीकरण व टी– जंक्शन विकसित करणेबजेट कोड नं. (CE20B101/T2-101) | --- | र.रू. ३ कोटी २८ लक्ष |

**निर्णय – सदर विषय मान्य करून मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१०१८**

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा हिस्सा पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआवि/ ७९६, दि. २५/१०/२०२२ चे पत्र.

१) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडला सन २०२२–२३ या अर्थिक वर्षात FE50A104 या अर्थशिर्षकामध्ये र.रू. ७५ कोटी रक्कम देणेसाठी तरतूद केलेली आहे. सदर तरतुदीमधून सन २०२२–२३ या अर्थिक वर्षात वेळोवेळी राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या रक्कमे इतका निधी प्राप्त झालेनंतर व पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी मागणी केलेनुसार मनपा समहिस्सा देणेस.

२) PSCDCL यांना राज्य शासनामार्फत र.रू. २४.५० कोटी इतकी रक्कम प्राप्त झाल्याने व पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी मागणी केलेनुसार मनपा समहिस्सा र.रू. २४.५० कोटी देणेस.

३) सदरची रक्कम पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे नावाने RTGS / धनादेशाने अदा करणेस.

**निर्णय – सदर विषय मान्य करून मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही/-xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दिनांक ०९/११/२०२२ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही/-xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**